| MHND020027862023 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११५६/२०२३<br><br>राधाबाई व इतर वि. निरंक |
|---|---|

**निशाणी क्र. ०१ वरील आदेश**

{दिनांक. ०३ /१०/२०२३}

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदार हिचे असे कथन आहे की, **मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे,** यांचे अर्जदार क्र. १ ही आई, अर्जदार क्र. २ ही पत्नी, अर्जदार क्र. ३ व ५ ही मुले व अर्जदार क्र. ६ व ७ हया मुली आहेत. मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे दिनांक १८/१०/२०१८ रोजी वाडी बु. नांदेड येथे निधन झाले आहे व अर्जदार क्र० १ यांचे पती मयत नामे भिवाजी पि. महादु बुक्तरे यांचा मृत्यु दिनांक ०६/१०/२०१४ रोजी नांदेड येथे झाला आहे.

०३. मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांना अर्जदार क्र.१ ते ७ यांच्या व्यतिरिक्त कोणीही कायदेशीर वारस नाहीत. तसेच त्यांना शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्याकरिता केलेला आहे.

०४. अर्जदार क्र. १ ते ७ हेच मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे वारस असल्याचे सिध्द करणेकरीता खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहे.

| अ.क्र | कागदपत्रे | निशाणी क्रंमाक |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार क्र.३ गौतम व्यंकटराव बुक्तरे यांचे सरतपासाचे शपथपत्र | १८ |

| | | |
|---|---|---|
| ०२. | दिनांक १७/०८/२०२३ रोजीची 'उदयाचा मराठवाडा' या वृतपत्रातील पेपर नोटीस | १९ |
| ०३. | मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | ०९ |
| ०४. | मयत भिवाजी पि. महादु बुक्तरे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | १० |
| ०५. | अर्जदार क्र. १ ते ७ यांच्या आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत | ११ ते १७ |

०५. अर्जदारातर्फे पुरावा संपल्याची पुरशिस नि.क्र. २० वर दाखल करण्यात आली आहे.

०६. नि. क्र. ०१ वरील आदेशाव्दारे सर्व सामान्यांकडून हरकत आक्षेप नोंदविण्याकरीता जाहीर प्रगटन दैनिक 'उदयाचा मराठवाडा' या वृत्तपत्राचे १७/०८/२०२३ च्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले. विहीत मुदतीत अर्जदार यांनी दाखल केलेला सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुत अर्ज निर्वीवादीत राहिला.

०७. साक्षीदार यांच्या पुराव्यातील विधानांचे कोणत्याही प्रकारे खंडण झालेले नाही. मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांच्या मृत्युची सिध्दता मृत्युप्रमाणपत्र अनुक्रमे (निशाणी क्र. ०९) व्दारे सिध्द होत आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या सरतपासाचे शपथपत्र व त्या सोबतच्या कागदापत्रांची पडताळणी केली असता, असे आढळुन येते की, अर्जदार हे मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे वारस असुन, त्यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. अर्जदाराने दाखल केलेल्या पुराव्याचे कोणीही खंडण न केल्याने दाखल पुराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व

कायद्यातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार क्र.१ ते ७ हे मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहेत. परिणामतः निम्नलिखित आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| ०२ | अर्जदार क्र. १ ते ७ यांना मयत व्यंकटी भिवाजी बुक्तरे, यांचे वारस प्रमाणपत्र हे योग्य ती न्यायालयीन शुल्क आकारुन नियमानुसार देण्यात यावे. |

AVINASH DASHRATH GORE

Digitally signed by AVINASH DASHRATH GORE
Date: 2023.10.03 16:56:43 +0530

ठिकाणः नांदेड,

(श्री. ए. डी. गोरे)

दिनांक: ०३/१०/२०२३

९ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नांदेड.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P. D. F. File Order are same word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Ku. K.D.Pawar (L.G. Stenographer) |
| Name of court | : 9th Jt.C.J.J.D.Nanded |
| Date | : 03/10/2023. |
| Order signed by the Presiding Officer | : 03/10/2023. |
| Order uploaded on | : 03/10/2023. |